# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पाटण हॉटेल मॅनेजमेंटच्या अभिषेक आंधळेची दुबईत निवड

वार्ताहर

पाटण

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचा विद्यार्थी अभिषेक आंधळे याची दुबईमधील लापिता पार्क अँड रिसॉर्ट या हॉटेलमध्ये निवड झाली. कॉलेजचे उत्तम शिक्षण व विद्यार्थीची मेहनत याची सांगड घालत त्याची पंचतारांकित हॉटेलमध्ये निवड झाल्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अभिषेक आंधळे याने येथील कॉलेजमधून हॉटेल मॅनेजमेंटचा डिप्लोमा पूर्ण करून त्यानंतर कॉलेजमार्फतच झालेल्या प्लेसमेंटमधून कोर्टयार्ड बाय मॅरियॉट या हॉटेलमध्ये आपले ट्रेनिंग पूर्ण झाल्यानंतर त्याची याच हॉटेलमध्ये हाऊसकिपींग डिपार्टमेंटमध्ये निवड झाली. अभिषेकने परदेशात जाण्यासाठीच्या अथक प्रयत्नांना यश आले असून त्याची मुलाखतीतून निवड झाली.



पाटण : अभिषेक आंधळे याचा सत्कार करताना अमरसिंह पाटणकर. समवेत संजीव चव्हाण, प्राचार्य चेतन सावंत, प्रा. भारत कांबळे, शिवाजी पवार व मान्यवर.

अभिषेक हा सांगलीमधील विद्यार्थी असून पाटणमध्ये राहून हलाखीत शिक्षण घेऊन त्याने हे यश संपादन केले आहे. आपल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात उत्तम नोकरीची संधी प्राप्त व्हावी यासाठी इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट सदैव प्रयत्नशील असून दहावी, बारावी तसेच पदवीनंतर डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जात आहे. कोर्स पूर्ण झाल्यानंतर देशात व परदेशात ट्रेनिंग व जॉब प्लेसमेंट उपलब्ध करून देण्याची सुवर्णसंधी कॉलेजमार्फत करून दिली आहे.

कॉलेज मध्ये सातारा जिल्ह्यातील विविध भागांमधून येऊन विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत.इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट हे सातारा जिल्ह्यातील प्रथम आयएसओ (१००१ :२००५) मानांकित कॉलेज असून कॉलेज मध्ये सुसज्य क्लासरूम्स , डिजिटल मल्टिमिडीया रूम, ट्रेनिंग किचन, रेस्टॉरंट, बँक्वेट हॉल, फ्रंट ऑफिस, हाऊसकिपींग रूम, ऑडिटोरिअम हॉल, लायब्ररी, संगणक लॅब, मुले व मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेल, उच्च अनुभवी शिक्षकवर्ग अशा सर्व सोयींनी परिपूर्ण असणारे हे कॉलेज अल्पावधीतच सातारा जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्र, कोकणातील विद्यार्थी व पालकांच्या पसंतीस उतरले आहे.

अभिषेक आंधळे याचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण तसेच प्राचार्य चेतन सावंत, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर सपकाळ, प्रा. भारत कांबळे तसेच शिक्षकेतर वर्ग यांनी अभिनंदन केले.